द महाराष्ट्र
स्टेट केमिस्ट्स् ॲन्ड
ड्रगिस्ट्स् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION
SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA
OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : AIOCD
All India Organisation of Chemists & Drugists.

April 6, 2020

Ref : APS/MSCDA/475/2020

**ALL THE OFFICE BEARERS / ZONAL OFFICE BEARERS &**
**DISTRICT PRESIDENTS/SECRETARIES**
**OF THE M.S.C.D.A.**

**Subject : Notification by Public Health Department, Maharashtra State dt. 3rd April 2020**

Sir,

Please find attached notification of Public Health Department, Maharashtra State, dated 3rd April 2020 in respect to the manufacturing and supply of PPP kits and N95 masks. (copy attached for your ready reference and knowledge,

As per the notification you can't stock the goods or purchase the goods which are not approved by the Hafkin Biopharmaceutical Corporation Ltd and Maharashtra government.

You are not allowed to sale it to any consumer other than the state government or the institutions allowed /approved by State Government.

Kindly take it seriously and inform all the members urgently to avoid any further complications to them. expecting your speedy action in the matter

Thanking you.

Yours faithfully,
**For The MSCDA**

**(Anil Navandar)**
**Hon Gen. Secretary**

# अधिसुचना

सार्वजनिक आरोग्य विभाग,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकूल,
१० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दि. ३ एप्रिल २०२०.

**क्रमांक करोना २०२०/प्र क्र ५८/ आरोग्य ५ : ज्या अर्थी महाराष्ट्र राज्यात** दिनांक १३ मार्च २०२० च्या अधिसूचनेनुसार साथरोग नियंत्रण कायदा, १८९७ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. तसेच करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी दिनांक १४ मार्च २०२० च्या अधिसूचनेनुसार कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२० नियमावली लागू करण्यात आलेली आहे,

ज्या अर्थी करोना रुग्णांवर प्रत्यक्ष उपचार करणाऱ्या आरोग्य सेवेतील वैद्यकीय अधिकारी, परिचारीका व निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांना प्रादुर्भावापासून संरक्षणासाठी पी.पी.ई. किट व एन ९५ मास्कची नितांत आवश्यकता असते.

ज्या अर्थी, केंद्र शासनाने, दिनांक १ एप्रिल २०२० पासून पी.पी.ई. किट व एन ९५ मास्क यांना औषधे म्हणून अधिसूचीत केले आहे,

या पार्श्वभुमीवर अनेक उत्पादकांनी पी.पी.ई. किट व एन ९५ मास्कचे उत्पादन, वितरण व विक्री सुरु केल्याचे निदर्शनास आलेले आहे. या खाजगी उत्पादकांनी उत्पादन वितरण व विक्री केलेल्या पी.पी.ई. किट व एन ९५ मास्कचा दर्जा व गुणवत्तेवर नियंत्रण असणे अत्यंत आवश्यक आहे अन्यथा गुणवत्तापूर्ण उत्पादन नसल्यास आरोग्य सेवा देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना करोना प्रादुर्भावाचा धोका निर्माण होऊ शकतो. ही बाब लक्षात घेता सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचना व साथरोग कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीतील तरतूदीनुसार पी.पी.ई. किट व एन ९५ मास्क यांचे उत्पादन, वितरण व विक्री बाबत खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

ज्या अर्थी महाराष्ट्र शासनाने पी.पी.ई. किट व एन ९५ मास्क यांच्या दर्जा व गुणवत्तेबाबतची मानके निश्चित केली आहेत त्या अर्थी महाराष्ट्र राज्यात पी.पी.ई. किट व एन ९५ मास्क विकू इच्छितात असे उत्पादक / वितरक / अडते (एजंट) यांनी त्यांचे उत्पादनाचा दर्जा व गुणवत्ता मानकांनुसार मेसर्स हाफकीन बायोफार्मास्युटिकल कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय उत्पादक / वितरक / अडते (एजंट) यांना पी.पी.ई. किट व एन ९५ मास्क महाराष्ट्र राज्यात विकता येणार नाही.

ज्या अर्थी राज्यात पी.पी.ई. किट व एन ९५ मास्क यांची उपलब्धता कमी आहे व याची आवश्यकता लक्षात घेता त्याअर्थी अनावश्यक साठेबाजीस प्रतिबंध करण्यास्तव, महाराष्ट्र राज्यात पी.पी.ई. किट व एन ९५ मास्क यांची विक्री व वितरण फक्त राज्य शासनाच्या मान्यतेने व महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या दराने महाराष्ट्र शासनास किंवा महाराष्ट्र शासनाने पी.पी.ई. किट व एन ९५ मास्क खरेदीसाठी परवानगी दिलेल्या संस्थेस करण्यात यावे.

याबाबत काही अडचणी किंवा अधिकचे मार्गदर्शन आवश्यक असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा

- व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायोफार्मास्युटिकल कॉर्पोरेशन लिमिटेड,
  मुंबई - ०२२-२४१५ ०६२८
- सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग- ०२२ - २२६२ २१७९
- प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग - ०२२ - २२६१ ७३८८

या आदेशाचे उल्लंघन केल्यास सर्व संबंधीत साथरोग नियंत्रण कायदा, १८९७ अधिनियमातील तरतूद, आपत्ती व्यवस्थापन कायदा व अन्न व औषधी व्यवस्थापन कायद्यातील विविध तरतूदीनुसार दंडनिय कार्यवाहीस पात्र राहतील.

सदर अधिसूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येईल व याबाबतच्या पुढील आदेशापर्यंत लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने.

प्रदीप व्यास

(डॉ. प्रदीप व्यास)
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

प्रत मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
प्रत प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रत सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग , मुंबई
प्रत सचिव, आपत्ती व्यवस्थापन. मंत्रालय, मुंबई
प्रत विभागीय आयुक्त (सर्व)
प्रत महापालिका आयुक्त (सर्व)
प्रत जिल्हाधिकारी (सर्व)
प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रत व्यवस्थापकीय संचालक हाफकीन इन्स्टिटयूट, मुंबई -
प्रत आयुक्त, आरोग्य सेवा, व संचालक, रा ग्रा अ मुंबई
प्रत आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई
प्रत संचालक, आरोग्य सेवा, मुंबई / पुणे
प्रत सह संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
प्रत जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
प्रत जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)